IMPACT FACTOR (SJIF) 2021 = 7.380

ISSN 2319-4766


AN INTERNATIONAL PEER REVIEWED & REFEREED JOURNAL

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL-JUNE,2021, VOL- 10, ISSUE-51

## Special Issue of Department of History, Lokmanya Mahavidyalaya Warora, Dist. Chandrapur (MS)

5th June 2021



# RECENT TRENDS IN MODERN HISTORY

MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA PIMPRI PUNE-17

**Chief Editor**
Dr. Subodh Kumar Singh
Principal

**Editor**
Dr. Dipak P. Lonkar
Head, Dept. of History

Book 2

| | | |
|---|---|---|
| 67 | अचलपूर शहरातील प्रमुख वीरगळ<br>*डॉ.ओमप्रकाश सा. बोबडे* | 323-325 |
| 68 | **राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांचे, राष्ट्रीय एकात्मतेसंबधी विचार**<br>*प्रा.डॉ.भारत वि.नखाते* | 326-329 |
| 69 | **क्रांतिकारक : वीर बाबुराव शेडमाके**<br>*प्रा. डॉ. डी. एन. कामडी* | 330-333 |
| 70 | वंचितांचा इतिहास<br>*डॉ. कल्पना एम. सांगोळे* | 334-338 |
| 71 | शस्त्रशास्त्र : इतिहास घडवणाऱ्या शस्त्रांच्या इतिहासलेखनाचे शास्त्र<br>*श्री. मृण्मय दीपक अरबुणे* | 339-341 |
| 72 | स्वयंभू श्री. हरिश्चंद्र महादेव मंदिराचा इतिहास<br>*प्रा. डॉ. मोकाटे नाथा रामभाऊ* | 342-345 |
| 73 | स्थानिक इतिहास आणि त्यामधील प्रमुख घटक<br>*प्रा. डॉ. अशोक ज्ञानदेव पाटील* | 346-348 |
| 74 | ब्रिटिश कालीन चंद्रपूर नगरपालिकेतील सार्वजनिक शिक्षण सुधारणा<br>*प्रा. डॉ. प्रमोद ना. घ्यार* | 349-351 |
| 75 | **चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासींचे वैभवशाली पण दुर्लक्षित लोकसाहित्य एक मागोवा**<br>*प्रा.संदीप पुंडलिक नन्नावरे* | 352-356 |
| 76 | वऱ्हाडातील महानुभाव संप्रदाय: एक सामाजिक क्रांती<br>*डॉ. गजेन्द्र बी. ढवळे* | 357-362 |
| 77 | कासेगाव येथील प्राचीन शिव मंदिर एक अभ्यास<br>*डॉ. रविकीरण जाधव & श्री. ज्ञानेश्वर सतिश झरकर* | 363-368 |
| 78 | सबाल्टर्न लेखनप्रवाह आणि भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत चंद्रपूर जिल्हयातील वंचीतांचे योगदान<br>*डॉ. पुरूषोत्तम माहोरे* | 369-373 |
| 79 | विसाव्या शतकातील भारतीय मुस्लीम स्त्रियांची स्थिती<br>*कु. सानिया सफराजखान पठाण* | 374-378 |
| 80 | भारतातील स्त्रीयांच्या उन्नतीची चळवळ<br>*प्रा. कांबळे शिवाजी ईरबा* | 379-383 |
| 81 | बांग्लादेश संदर्भात इंदिरा गांधी यांचे कर्तृत्व<br>*प्रा. शिवचरण धांडे* | 384-386 |
| 82 | सातपुडा पर्वतरांगातील आदिवासींचे सण-उत्सव<br>*प्रा. डॉ. रघुनाथ धनालाल चौधरी* | 387-392 |
| 83 | स्त्रीवाद<br>*डॉ. सतिश खरात* | 393-398 |


MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA • PIMPRI PUNE-17 •

# चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासींचे वैभवशाली पण दुर्लक्षित लोकसाहित्य एक मागोवा

**प्रा.संदीप पुंडलिक नन्नावरे**
*सहाय्यक प्राध्यापक, महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी, पुणे- १७*
*मो.नो. ८६०५९७०७७० snannaware98@gmail.com*

प्रत्येक समाजाची एक विशिष्ट अशी संस्कृती असते. समाज हा प्रगत असो किंवा अप्रगत प्रत्येक समाजाची एक वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती असते. संस्कृती शिवाय कोणत्याही समाजाची कल्पना करता येत नाही. संस्कृती हा प्रत्येक मानव समूहाचा अविभाज्य भाग आहे. फक्त एवढेच की प्रत्येक समाजाची संस्कृती ही एक सारखी नसते त्याला विभिन्नता असते. संस्कृतीचा व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वावर विशेष प्रभाव असतो. संस्कृतीचे हस्तांतरण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे होत असते.म्हणून संस्कृतीही थोड्याबहुत प्रमाणात काही बदल स्वीकार्य आहे. आजही शेकडो वर्षांपासून टिकून असलेली दिसून येते. ते फक्त संस्कृतीच्या हस्तांतरणाच्या प्रक्रियेमुळे.

"संस्कारपूर्ण,संस्कारमय जीवन जगण्याची देशकाल विशिष्ट रीत म्हणजे संस्कृती" १

संस्कृती ही समाजाची निर्मिती आहे एकट्या दुकट्या व्यक्तीच्या जीवनक्रमात संस्कृतीची निर्मिती होणे अशक्य आहे.२ संस्कृतीची उत्पती,जतन व संक्रमण भाषेच्या द्वारे होते.भाषा हे संस्कृतीचे एक प्रभावी अंग आहे. भाषेशिवाय संस्कृतीची निर्मिती होणार नाही व संक्रमण तर सर्वस्वी अशक्य आहे.३

विदर्भातील नऊ आणि पश्चिममहाराष्ट्रातील पाच जिल्ह्यांमध्ये कमी जास्त प्रमाणात आदिवासीची वस्ती असली तरी काही जिल्ह्यात ते जास्त मोठ्या प्रमाणात आढळतात. प्रमुख्याने गडचिरोली हा जिल्हा आदिवासी जनसंख्येच्या दृष्टीने मोठा म्हणून प्रसिद्ध असून सांस्कृतिककरण्याच्या फारच खालच्या स्तरात असलेला. म्हणून अतिमागास असलेली माडिया-गोंड हि जमात याच जिल्ह्यात सापडते. त्यानंतर चंद्रपूर, यवतमाळ,अमरावती या जिल्ह्यांमध्ये आणि नंतर नागपूर व इतर जिल्ह्यांमध्ये आदिम जमाती मोठ्या प्रमाणात आढळतात.विविध आदिम जमाती विखुरलेल्या असल्या तरी त्यात गोंड,परधान कोलाम,माना,हलबा या आदिम जमाती मोठया प्रमाणात आढळतात.त्यांच्यातील सांस्कृतीकरणही भिन्न स्तराला असले तरी इतर समाजापेक्षा ते कमी स्तराला आहे.४

आदिवासी संस्कृती ही पुरातन,अभिजात आणि समृद्ध संस्कृती आहे.आम्हा सर्वांच्या पूर्वइतिहासतील अनेक प्रथापपरांचे जतन अजूनही त्यांनी केलेले आहे व त्या संस्कृतीचे जतन आणि अभिव्यक्ती ही प्रामुख्याने आदिवासींच्या लोकसाहित्यातून झालेली आहे.त्यांच्या लोकगीते आणि लोककथांमधून ते प्रगट होते.मौखिक पद्धतीने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला ते हस्तांतरित होत जाते. नृत्याच्या वेळी गाहील्या जाणाऱ्या गीतांमधून त्यांचा उच्चार होतो. जन्म,विवाह,मृत्यू,सण,उत्सव यावेळी पाहुण्याचे स्वागत आणि धार्मिक विधी इत्यादी प्रसंगाचा किती बोजा नृत्य पाहुण्यांचे स्वागत आणि धार्मिक विधी इत्यादी प्रसंगी अशी गीते बहुधा नृत्यासह गाण्यात येतात.५

विकास कार्यक्रमात आणि शिक्षणाचा प्रसार यातून आदिवासांची स्थिती बदलत असून त्यांच्या आधुनिकरणाची प्रक्रिया वेगाने होत आहे. ही जरी स्वागतार्ह बाब असली तरी एक विपरीत बाब म्हणजे अनेक शिकलेली मुले आपल्या आदिम बांधवांना व त्यांनी जपलेल्या संस्कृतीला विसरत चालली आहेत.कदाचित भविष्यात जुनी पिढी नामशेष झाल्यावर आदिम लोकसाहित्याचा वारसा उपलब्ध होणार नाही बोलीच्याच स्वरूपात असलेल्या आदिमांच्या लोकसाहित्याला शब्दांकित करून ठेवण्यासाठी हा उद्देश प्रासंगिक सुरवात तुरळक लोकसाहित्य प्रकाशित होत असले तरी संकलित संशोधित व सांस्कृतिक संदर्भासह ते मांडण्याचा हा प्रयत्न आहे. ६

गोड,परधान, केलाम माना या पाच प्रमुख आदिम जमातींचाही लोकसाहित्याचा आस्वाद वाचकांना देणे. खरं तर माणूस बोलायला आधी लागला लिहिण त्याला शिकवं लागल. आपली पुरातन संस्कृती सांस्कृतिक ठेवा, समाजाची